**संचालक,**
**मुंबई विकास विभाग चाळी यांचे कार्यालय,**
**सावली इमारत, गणपत जाधव मार्ग,**
**वरळी, मुंबई-४०० ०१८.**

| जा.क्र.मुंविविचा/संलि/ ८९६ /२०१९ | दिनांक : २८ / ०२ /२०१९ |
|---|---|

प्रति
अवर सचिव,
गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई

आवक क्र. : ६२५
दिनांक : ०१/०३/२०१९
का.अ. / बीडीडी/मुं.मं.

**विषय :- चाळ अधीक्षक कर्मचाऱ्यांना विकास विभाग चाळींमधील मध्यवर्ती न्हाणीगृहाचे भाडेदारी तत्वावर वास्तव्यासाठी वाटप करणेबाबत.**

**संदर्भ :-**
**१. या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश जा.क्र.मुंविविचा/म.न्हा.गृ./१९११/२०१७, दिनांक ०६/१०/२०१७.**
**२. मा.श्री. कालीदास कोळंबकर साहेब यांचे दिनांक २४/०१/२०१९ रोजीचे पत्र.**
**३. अवर सचिव, गृहनिर्माण विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.विविचा-२०१९/प्र.क्र.३७/गृनिप, दिनांक १८/०२/२०१९.**
**४. कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.विविचा-२०१९/प्र.क्र.३०/विविचा-२०१७/प्र.क्र.२८८/गृनिप, दि.१८/०२/२०१९.**
**५. या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश जा.क्र.मुंविविचा/संलि/ ८९५ /२०१९, दिनांक २६ /०२ /२०१९.**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भास अनुसरुन सादर करण्यात येते की, या कार्यालयाच्या अधिपत्याखालील व्यवस्थापक यांच्या कार्यालया मार्फत प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे व शासन निर्णय दिनांक ११/१०/१९९४ व दिनांक २८/०६/२०१७ नुसार तत्कालीन संचालक, मुंबई विकास विभाग चाळी, वरळी यांनी त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन विकास विभाग चाळींमधील मध्यवर्ती न्हाणीगृहाचे वाटप अधिकारी/कर्मचारी यांना वास्तव्याकरीता भाडेदारी तत्त्वावर वाटप केलेले आहे.

परंतु सदर प्रकरणी शासनाची पूर्वपरवानगी घेण्यात आलेली नसल्याने संदर्भित आदेश क्र. १ हे संदर्भित आदेश क्र.५ अन्वये रद्द करण्यात आलेले आहेत. त्याची साक्षांकित प्रत आपल्या माहितीकरीता सविनय सादर करण्यात येत आहे.

**सोबत :- संदर्भ क्र.५ ची साक्षांकित प्रत.**

**आपला विश्वासू,**
**संचालक,**
**मुंबई विकास विभाग चाळी,**
**वरळी, मुंबई १८.**

प्रत :- मा.श्री. कालीदास कोळंबकर, यांना माहितीकरीता सविनय सादर.

प्रत :- मा. आ. श्री. मधु चव्हाण, चेअरमन, म्हाडा, मुंबई मंडळ, वांद्रे (पू), मुंबई-४०००५१ यांना माहितीकरीता सविनय सादर.

प्रत :- मुख्य अधिकारी, गृहनिर्माण भवन, तिसरा मजला, कलानगर, वान्द्रे(पूर्व), मुंबई ४०००५१ यांना माहितीकरीता सविनय सादर.

प्रत :- कार्यकारी अभियंता, बीडीडी/मुंबई मंडळ, गृहनिर्माण भवन, दुसरा मजला, रुम नं.३१८, कलानगर, वान्द्रे(पूर्व), मुंबई ४०००५१ यांना माहितीकरीता.

प्रत :- कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीकरीता सविनय सादर.

## कार्यालयीन आदेश १८

**विषय :- चाळ अधीक्षक कर्मचाऱ्यांना विकास विभाग चाळींमधील मध्यवर्ती न्हाणीगृहाचे भाडेदारी तत्वावर वास्तव्यासाठी वाटप करणेबाबत.**

**संदर्भ :- या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश जा.क्र.मुंविविचा/म.न्हा.गृ./१९११/२०१७, दिनांक ०६/१०/२०१७.**

उपरोक्त विषयाच्या संदर्भित आदेशान्वये व्यवस्थापक यांच्या मार्फत प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे व शासन निर्णय दिनांक ११/१०/१९९४ व दिनांक २८/०६/२०१७ नुसार तत्कालीन संचालक, मुंबई विकास विभाग चाळी, वरळी यांनी त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन विकास विभाग चाळींमधील मध्यवर्ती न्हाणीगृहाचे वाटप संदर्भित आदेशात नमुद ८-चाळ अधीक्षक व १-संचालकांचे लिपीक एकूण ९ कर्मचाऱ्यांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या प्रमाणे वास्तव्याकरीता भाडेदारी तत्त्वावर वाटप केलेले आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | वाटप करण्यात आलेले न्हाणीगृह |
|---|---|---|
| १. | श्री. सु. रा. सोनावणे, चाळ अधीक्षक | विकास विभाग चाळ क्र.१४-ब, तळमजला, मध्यर्ती न्हाणीगृह, नायगांव, मुंबई-१४ |
| २. | श्री. चं. धों. नलावडे, चाळ अधीक्षक | विकास विभाग चाळ क्र.०१-ब, पहिला मजला, मध्यर्ती न्हाणीगृह, नायगांव, मुंबई-१४ |
| ३. | श्री. एम. वाय. धनेश्वर, चाळ अधीक्षक | विकास विभाग चाळ क्र. ०७-ब, तळमजला, मध्यर्ती न्हाणीगृह, नायगांव, मुंबई-१४ |
| ४. | श्री. एन. डी. गोडे, चाळ अधीक्षक | विकास विभाग चाळ क्र. ०७-ब, पहिला मजला, मध्यर्ती न्हाणीगृह, नायगांव, मुंबई-१४ |
| ५. | श्री. ए. ए. देसाई, चाळ अधीक्षक | विकास विभाग चाळ क्र. ०७-ब, दुसरा मजला, मध्यर्ती न्हाणीगृह, नायगांव, मुंबई-१४ |
| ६. | श्री. आर. डी. धनविजय, चाळ अधीक्षक | विकास विभाग चाळ क्र. ०१-ब, तिसरा मजला, मध्यर्ती न्हाणीगृह, नायगांव, मुंबई-१४ |
| ७. | श्री. ए. एम. माने, चाळ अधीक्षक | विकास विभाग चाळ क्र. ०७-ब, तिसरा मजला, मध्यर्ती न्हाणीगृह, नायगांव, मुंबई-१४ |
| ८. | श्री. एस. बी. अहिरे, चाळ अधीक्षक | विकास विभाग चाळ क्र. ०१-ब, तळमजला, मध्यर्ती न्हाणीगृह, नायगांव, मुंबई-१४ |
| ९. | श्री. वाय. एम. पिंजारी, संचालक लिपीक | विकास विभाग चाळ क्र. ०१-ब, दुसरा मजला, मध्यर्ती न्हाणीगृह, नायगांव, मुंबई-१४ |

परंतु मध्यवर्ती न्हाणीगृहाचे वास्तव्याकरीता वाटप करावयाचे झाल्यास त्यास शासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असून शासनाचे आदेशानुसार न्हाणीगृहाचे वाटप करण्यात येते. सदर प्रकरणी शासनाची पूर्वपरवानगी घेण्यात आल्याचे निदर्शनास येत नाही.

सबब, संदर्भित आदेशात नमुद ८-चाळ अधीक्षक व १-संचालकांचे लिपीक एकूण ९ कर्मचाऱ्यांना वास्तव्याकरीता भाडेदारी तत्त्वानुसार वाटप केलेले मध्यवर्ती न्हाणीगृहाचे आदेश, या आदेशान्वये रद्द करण्यात येत आहेत.

जा. क्र. मुंविविचा/संलि/ ८९५ /२०१९
संचालक, मुंबई विकास विभाग चाळी
यांचे कार्यालय, गणपत जाधव मार्ग,
वरळी, मुंबई १८
दिनांक :- २६।०२।२०१९

**संचालक,**
**मुंबई विकास विभाग चाळी,**
**वरळी, मुंबई-१८**

प्रत :- व्यवस्थापक, मुंबई विकास विभाग चाळी, वरळी यांना माहितीकरीता व पुढील योग्य त्या कार्यवाहीकरीता रवाना.
वरील माहितीनुसार संबंधित चाळ अधीक्षकास योग्य त्या कार्यवाहीचे आदेश देण्यात यावेत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.